# प्रकरण

# पहिले

# प्रकरण पहिले
## प्रस्तावना

१.१ प्रस्तावना

१.२ समस्या विधान

१.३ पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या

१.४ संशोधनाचे महत्व

१.५ संशोधनाची उद्दिष्टे

१.६ परिकल्पना

१.७ संशोधनाची व्याप्ती

१.८ संशोधनाची मर्यादा

१.९ प्रकरणीकरण

१.१० समारोप


# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

### १.१ प्रस्तावना

आज एकविसाव्या शतकात शिक्षणशास्त्राचा विकास झपाट्याने होत आहे. प्रयोगिक संशोधनामुळे अध्ययनाच्या अध्यापनाच्या विविध पद्धती प्रभावी अध्ययन अध्यापनासाठी वापरण्यात येत आहेत. अध्यापन पद्धती म्हणजे एखादा विशिष्ट शेक्षणिक विचार साकार करण्याचा केलेला प्रयत्न असतो. म्हणूनच अध्यापन पद्धतीचा विचार करताना प्राथमिक महत्त्वाची बाब म्हणजे शिक्षणविषयक व अध्यापनविषयक शिक्षकाचा दृष्टिकोन ही असते. काही अध्यापन पद्धती या शिक्षक केंद्रीत तर काही विद्यार्थी केंद्रीत असतात. शिक्षणासंबंधीचा कोणता दृष्टिकोन शिक्षक स्वीकारतात यावरुन कोणती अध्यापन पद्धती अंगिकारावी हे ठरते. जगातील थोर विचारवंताच्या लिखाणातून अध्यापनविषयक विविध दृष्टिकोन समजतात.

१




आकृती क्र.१.१ अनुदेशनासाठी प्रणाली

आजची शिक्षण व्यवस्था ही विद्यार्थी केंद्रीत आहे. अध्यापनात विद्यार्थ्यांचा सहभाग अधिकाधिक वाढावा यासाठी नवनव्या सुधारणा केल्या जात आहेत. शिक्षकाने वर्गात जाण्यापूर्वी पाठाची तयारी करावी. पाठाची योजना अद्यावत तंत्राप्रमाणे असावी. यासाठी अनेक शिक्षणतज्ञ प्रयत्न करीत आहेत. वर्गात अध्यापन करीत असताना अध्ययन अनुभव कसे द्यावेत. उदाहरणे, स्पष्टीकरण कसे द्यावे, प्रश्न कसे विचारावेत, उत्तरे कोणत्या पद्धतीने स्वीकारावीत, फलक लेखन केव्हा व कसे करावे, अध्यापन साहित्य कोणते व कसे वापरावे याचे नियोजन कसे करावे की ज्यायोगे शैक्षणिक उद्दिष्टे साध्य होतील. या सर्व गोष्टींचा शिक्षणशास्त्रात विचार केला जातो. त्यामुळे आज अध्यापन शास्त्र हे गतिमान शास्त्र आहे.


अध्यापनशास्त्रात आशय व पद्धती या दोन्हींचाही विचार होऊ लागला आहे. प्रभावी अध्यापनासाठी आशयावर प्रभुत्व असणे आवश्यक असते. पण एवढीच गोष्ट पुरेशी नाही. त्यामुळे प्रत्येक शिक्षकाला आशयाच्या विविध पैलूंची माहिती असणे गरजेचे आहे. प्रत्येक विषयाच्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची गरज, कुवत लक्षात घेऊन पाठ्यांश ठरविला जातो. प्रत्येक विषयाच्या पाठ्यांशाची उद्दिष्टे वेगळी असतात. त्यामुळे आशय घटक लक्षात घेऊन अध्यापन पद्धती, कार्यनीती ठरवावी लागते.

प्राथमिक व माध्यमिक स्तरावर मराठी ही मातृभाषा प्रथमभाषा म्हणून शिकविली जाते. मातृभाषेचे अध्यापन करताना ते कोणत्याही उपांगाचे असो ते प्रभावी व्हावे संस्कारक्षम व्हावे, विद्यार्थ्यांच्या अंत:करणापर्यंत जाऊन भिडावे अशी अध्यापकाची इच्छा असते. अध्ययन गतिमान होण्यासाठी त्याला जशी मानसशास्त्रीय बैठक असावी लागते. तसेच प्रभावी अध्यापनाचीही आवश्यकता असते. हे अध्यापन प्रभावी होण्यासाठी अध्यापनाच्या विविध पद्धती, तंत्रे, साधने यांचा उपयोग करणे अगत्याचे असते. विदयार्थ्यांची बौद्धिक पातळी व वयोगट यांचाही विचार करणे आवश्यक आहे.

भाषेच्या पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण केले असता सर्वसाधारणपणे पाठ्यपुस्तकात काही गद्य पाठ, पद्य पाठ तर पाठाच्या अनुषंगाने व्याकरण दिलेले आढळते. हा पाठ्य-पुस्तकातला आशय प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी शिक्षक अनेक पद्धती, तंत्रे वापरतो. शिक्षक हे सर्व विद्यार्थ्यांची अध्ययनाची गतिमानता वाढविण्यासाठी करतो.

मातृभाषा अध्ययनात जर विदयार्थ्याला गती प्राप्त झाली तर त्याच्या ठिकाणी वाङ्मयाबद्दल अभिरुची विकसित होते. सर्वसामान्यपणे भाषेतील वाङ्मय वाचकावर इष्ट व सुयोग्य संस्कार करीत असते. जीवनाच्या जडणघडणीत या संस्कारांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. पर्यायाने व्यक्तीचे जीवन घडविणारे मातृभाषा हे एक महत्त्वाचे साधन आहे. यासाठी भाषेचा शिक्षक सर्जनशील असावा लागतो. त्यांने पाठ्यांशाच्या आशयातील अनुभव, कल्पना, भावना, विचार, सौंदर्य लक्षात घेऊन मातृभाषेचे अध्यापन करावे अशी अपेक्षा आहे.

थोडक्यात




आकृती क्र.१.२ भाषेचे घटक

पारंपरिक पद्धतीने पाठनियोजन करुन अध्यापन केल्यास व मराठीतील आशय-घटकानुसार पाठनियोजन करुन अध्यापन केल्यास कोणत्या पद्धतीने अध्यापन प्रभावी ठरते हे पाहण्यासाठी संशोधकाने पुढील समस्या निवडली आहे.

## १.२ समस्या विधान

'मराठी विषयामध्ये आशय घटकानुसार पाठनियोजनाचा शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या वर्गांतर्गत अध्यापनावर होणारा परिणाम - एक अभ्यास'

## १.३ समस्या विधानातील पारिभाषिक संज्ञांचा अर्थ

### मराठी विषय

**संकल्पनात्मक व्याख्या**

मराठी ही महाराष्ट्र राज्याची राज्यभाषा आहे.

महाराष्ट्रात मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी ही प्रथम भाषा म्हणून शिकविली जाते.

**कार्यात्मक व्याख्या**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे १९९३ यांनी तयार केलेले इयत्ता आठवीचे 'बालभारती' हे पाठ्यपुस्तक म्हणजे मराठी विषय होय.

### आशय

**संकल्पनात्मक व्याख्या**

१) आशय म्हणजे विद्यार्थ्यांना शिकवावयाचा मजकूर किंवा अध्यापनाची विषयवस्तू होय.[२]

२) आशय म्हणजे पाठ्यपुस्तकात छापलेला मजकूर होय.[३]

३) आशय म्हणजे अर्थपूर्ण मजकूर होय.[४]

४) आशय म्हणजे एखादा विशिष्ट हेतू मनात धरुन संकलित केलेली माहिती होय.[५]

## आशय घटक

### व्याख्या

१) आशय घटक म्हणजे तपशील, वस्तुस्थिती दर्शक विधाने संज्ञा, संबोध, तत्त्वे, नियम, सूत्रे, व्याख्या, घटना व्यक्ती, प्रसंग, सामान्यीकरण व सिद्धांत होय.[६]

सरपोतदार, भोसले, सांगळे

२) भाषेतील, गदय, पदय, व्याकरण यातील भाषाशास्त्रीय विश्लेषण व भाषा विकास म्हणजे आशय घटक होय.[७]

पवार, ना.ग.

### कार्यात्मक व्याख्या

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे १९९३ यांनी तयार केलेल्या इयत्ता आठवीच्या 'बालभारती' पाठ्यपुस्तकातील गद्य व पद्य पाठ्यांशाचे आशयानुसार कल्पना, भावना व विचार याप्रमाणे विभाजन म्हणजे आशय घटक होय.

## कल्पना

### संकल्पनात्मक व्याख्या

१) प्रतिमासृष्टीतील निवडक प्रतिमांची जुळणी करुन एक वेगळेच मानसिक चित्र तयार करण्याच्या प्रक्रियेला कल्पना असे म्हणतात.[८]

करंदीकर, सुरेश.

२) व्यक्तीच्या मानसिक विकासात संवेदन व अवबोध यानंतरच कल्पनेचा अवबोध होतो; आधी नाही. संवेदन होत नसताना देखील मनाला ज्याच्याबद्दल जाणिव होते किंवा विचार करता येतो. अशा मनाची प्रक्रिया म्हणजे कल्पना होय.[९]

शैक्षणिक टीपाकोश

**कार्यात्मक व्याख्या**

पाठ्यांशातील विविध घटना अथवा प्रसंगाने निर्माण होणाऱ्या प्रतिमांचे विश्लेषण, संश्लेषनातून नवीन कल्पनेची निर्मिती अथवा कल्पनांची मालिका तयार होणे म्हणजे कल्पना'

## भावना

**संकल्पनात्मक व्याख्या**

१) भावना म्हणजे रागभोगभयादि मानवी विचार [१०]

बेडेकर, दि.के.

२) उत्तेजक आणि प्रेरक गुणधर्म असलेली चेहऱ्यावरील आणि शारीरिक हावभावांनी युक्त अशी जाणीवेची व्यक्तिनिष्ठ स्थिती किंवा अवस्था म्हणजे भावना होय. [११]

मॉर्गन आणि किंग्ज (१९८४)

३) जागृत अवस्थेमधील व्यक्तिनिष्ठ भावनानुभव, राग, भीती, आनंद, खिन्नता, आश्चर्य किळस यासारख्या सुखात्मक व दु:खात्मक आविस्कारांना भावना असे म्हणतात. [१२]

विंलगीना व क्लिंगीना (१९८१)

**कार्यात्मक व्याख्या**

पाठ्याशांच्या लेखनकर्त्याला जीवनात आलेल्या अनुभवांचा अर्थबोध होऊन विशेष अशी तयार होणारी मनोरचना, तिचे आकलन, अर्थबोध होणे म्हणजे भावना होय.

## विचार

**संकल्पनात्मक व्याख्या**

१) विचार म्हणजे वस्तुचा विशेष हुडकणे, तो बाजूला करणे, म्हणून विचारात नेहमी प्रामुख्याने विश्लेषण व संश्लेषण यांचा संबंध येतो. परंतु हे जाणणे विशिष्ट वस्तुच्या

निव्वळ अनुभवापेक्षा वरच्या दर्जाचे असते. विचार हा भूत, भविष्यात शिरुन एका दृष्टीने काळाच्या मर्यादा ओलांडतो.[१३]

शैक्षणिक टीपाकोश

२) Thinking may be described as the conscious adjustment of an organism to situation

'व्यक्तीने परिस्थितीशी केलेले बोधात्मक पातळीवरील समायोजन म्हणजे विचार'[१४]

Collins and Drever

३) Thinking is manipulating aspect of post experiences implicitly

'विचार म्हणजे निर्णय घेण्यासाठी पूर्वानुभवांचा उपयोग करण्याचा पैलू '[१५]

नॉर्मन मन्

४) Thinking is mental activity in it's cognitive aspect

'नार्मन मन् विचार म्हणजे बोधात्मक बाजूचा मनोव्यापर'[१६]

Ross

**कार्यात्मक व्याख्या**

पाठ्यांशातील घटना किंवा प्रसंगातून व्यक्त झालेली समस्या, अडचण सोडविण्यासाठी तिच्या संबंधीचे विश्लेषण व संश्लेषण, त्यावरचे उपाय म्हणजे विचार होय.

## पाठनियोजन

**संकल्पनात्मक व्याख्या**

१) पाठनियोजन म्हणजे अध्यापन करण्यापूर्वी अध्यापन कृतीविषयी केलेला लेखी स्वरुपातील आराखडा होय.[१७]

गवस, राजन

२) पाठाचे वर्गात अध्यापन करण्यापूर्वी नियोजन करणे म्हणजे पाठनियोजन होय.[१८]

सरपोतदार,भोसले,सांगळे

३) पाठनियोजनात उद्दिष्टे, स्पष्टीकरणे, अध्ययन अनुभूती, शिक्षक कृती, विदयार्थी कृती, निष्पती इत्यादींचा समावेश असतो.[१९]

४) विद्यार्थ्यांचे अपेक्षित वर्तन व अध्यापनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी बहुविध कृती आणि साहित्य यांचे अर्थपूर्ण, सविस्तर व काळजीपूर्वक केलेले संघटन म्हणजे पाठनियोजन होय.[२०]

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

## कार्यात्मक व्याख्या

### पाठनियोजन (प्रायोगिक गटासाठो )

पाठनियोजन अध्यापन करण्यापूर्वी उद्दिष्टे, स्पष्टीकरणे, प्रस्तावना, हेतुकथन, विषय प्रतिपादन संकलन, उपयोजन, मूल्यमापन व स्वाध्याय इत्यादी अध्यापनकृतींमधून कल्पना, भावना व विचार या आशय घटकानुसार तयार करण्यात आलेला लेखी स्वरुपातील आराखडा होय.

### पाठनियोजन (नियंत्रित गटासाठी)

पाठनियोजन म्हणजे अध्यापन करण्यापूर्वी उद्दिष्टे, स्पष्टीकरणे, प्रस्तावना, हेतुकथन, विषय प्रतिपादन, संकलन, उपयोजन, मूल्यमापन व स्वाध्याय इत्यादी अध्यापन कृतीविषयक तयार केलेला लेखी स्वरुपातील आराखडा होय.

## शिक्षक प्रशिक्षणार्थी

### संकल्पनात्मक व्याख्या

A student who is learning to teach i.e. going through a Teacher Training Course [२१]

शिक्षक प्रशिक्षणार्थी म्हणजे असा विद्यार्थी जो अध्यापन कसे करावे याबाबत अध्ययन करीत आहे.

Derek Rowntree (१९९१)

### कार्यात्मक व्याख्या

शिक्षक प्रशिक्षणार्थी म्हणजे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर , महाराष्ट्र यास संलग्नित असणाऱ्या कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी येथे द्वितीय वर्ष एकात्मिक बी.ए.बी.एड् मध्ये सन २००५-०६ मध्ये अध्यापन कसे करावे याबाबत अध्ययन करीत असणारे मराठी अध्यापन पद्धतीचे सर्व प्रशिक्षणार्थी होय.

### अध्यापन

### संकल्पनात्मक व्याख्या

विद्यार्थीचे अध्ययन व्हावे या उद्देशाने अध्यापकाने केलेल्या कृती म्हणजे अध्यापन होय.[२२]

शेफलर

### कार्यात्मक व्याख्या

शिवाजी विदयापीठ कोल्हापूर, महाराष्ट्र यास संलग्नित असणाऱ्या कर्मवीर हिरे महाविद्यालय गारगोटी येथे द्वितीय वर्ष एकात्मिक बी.ए.बी.एड् मध्ये सन २००५-०६ मधील सर्व मराठी अध्यापन पद्धतीच्या शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांनी इयत्ता आठवी च्या वर्गात केलेले मराठी विषयाच्या पाठ्यांशाचे अध्यापन होय.

## १.४ संशोधनाचे महत्त्व

प्रस्तुत संशोधनात पारंपरिक पद्धतीने पाठनियोजन करुन अध्यापन केल्यास व आशयघटकानुसार पाठनियोजन करुन अध्यापन केल्यास शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्यापनात कोणता फरक पडतो. याचबरोबर कोणत्या पद्धतीने अध्यापन केल्यास ते अधिक प्रभावी होते हे पाहण्याचा प्रयत्न केलेला आहे.

शिक्षण म्हणजे संस्कार, शिक्षण म्हणजे अपेक्षित बदल, अंधारातून प्रकाशाकडे नेणे होय. शिक्षणामुळे व्यक्ती एका स्थितीतून दुसऱ्या स्थितीत जाते. विकासाला चालना

देणे म्हणजे शिक्षण. शिक्षण द्यावयाचे म्हणजे बुद्धी कशी वापरायची हे दाखवायचे ! मुलांच्या डोक्यात केवळ माहिती कोंबणे याला शिक्षण म्हणत नाहोत ! शिक्षणाने बुद्धी, अंत:करण आणि क्रियाकौशल्ये यांचा विकास साधला जातो. यासाठी अनेक शैक्षणिक आयोग आले. त्यांनी शिक्षणाची ध्येये निश्चित केली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ नुसार शिक्षणांची ध्येये पुढीलप्रमाणे निश्चित केलेली आहेत.

१) व्यक्तीमत्त्वाच्या शारीरिक, बौद्धिक व सुसंस्कृतता यांचा विकास करणे.

२) वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे आणि त्याबरोबर व्यक्तीच्या आध्यात्मिक व लोकशाही मूल्यांची जोपासना करणे.

३) व्यक्तीमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.

४) व्यक्तीला पर्यावरणाची जाण यावी म्हणून प्रयत्न करणे.

५) श्रमप्रतिष्ठेची जोपासना करणे.

६) धर्मनिरपेक्षता व सामाजिक न्याय यांचा परिपोष करणे.

७) राष्ट्रीय एकात्मता राखण्यासाठी व राष्ट्राची प्रगती साधण्यासाठी योग्य प्रकारची भावना निर्माण करणे.

८) शिक्षणातून आंतरराष्ट्रीय सामंजस्याला चालना देणे.

आपणास वरील शिक्षणविषयक ध्येयांत मातृभाषा अध्यापनाची ध्येये समाविष्ट असलेली दिसून येतात. अर्थात, मराठी प्रथम भाषा हा विषय तर हे ध्येय गाठवयास अनेक प्रकारे प्रयत्न करु शकतो. मराठी विषयाच्या माध्यमातून किती तरी संस्कार मुलांवर करता येतात. यासाठी दिलेली मातृभाषा अध्ययन अध्यापनाची ध्येये व उद्दिष्टे

१) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे.

२) विद्यार्थ्यावर सुसंस्कार करणे.

३) विद्यार्थ्याचा नैतिक विकास व्हावा या दृष्टीने विद्यार्थ्याला मदत करणे.

४) विद्यार्थ्यातील सर्जनशीलतेला मदत करणे.

५) विद्यार्थ्यातील मूलभूत भाषिक क्षमता (श्रवण, भाषण,वाचन,लेखन) विकसित करणे.

६) मातृभाषेच्या विविध बोलींचा परिचय करुन देणे.

७) प्रमाणित भाषेवर प्रभुत्व संपादन करण्यासाठी विद्यार्थ्याला मदत करणे.

८) विद्यार्थ्यांची विचारशक्ती विकसित करणे.

९) साहित्याचे रसग्रहण करण्याची क्षमता विद्यार्थ्यात विकसित करणे.


१०) विद्यार्थ्यात चिकित्सक वृत्ती विकसित करणे.

११) विद्यार्थ्यात नागरिकत्वाची गुणवैशिष्टये विकसित करणे.

१२) पर्यावरण, प्रदूषण, लोकसंख्या प्रस्फोट इ. सामाजिक प्रश्नांविषयी विद्यार्थ्यात जागृती निर्माण करणे.

१३) साहित्य वाचनाची आवड निर्माण करणे.

**थोडक्यात**




आकृती क्र.१.३ मातृभाषा अध्ययन अध्यापनाची उद्दिष्टे

शालेय स्तरावर विद्यार्थी बारा वर्षे शिक्षण घेत असतो. या कालावधीत मातृभाषा अध्यापनाची सर्वसामान्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे ठरविली आहेत.

१) लक्षपूर्वक श्रवण करणे व त्याचे आकलन होणे.

२) आपले विचार, भावना, कल्पना, इच्छा स्पष्ट व योग्य शब्दात व्यक्त करणे.

३) योग्य उच्चार करणे. आशयानुसार आवाजात योग्य चढउतार करुन योग्य गतीची जाण ठेवून बोलणे.

४) मनोमन वाचन करणे व त्याचे आकलन करणे.

५) सुवाच्य व वळणदार लेखन करणे.

६) उच्चार, स्वराघात आणि योग्य अभिव्यक्ती यांचा मेळ घालून अस्खलितपणे व भावपूर्ण प्रकट वाचन करणे.

७) आपले विचार, भावना, कल्पना, अनुभव लेखनाद्वारे प्रकट करण्याचे कौशल्य प्राप्त करणे.

८) विरामचिन्हांचा वापर करुन नीटनीटके लेखन करणे.

९) विविध प्रकारच्या साहित्य प्रकारांचा आस्वाद घेण्याची क्षमता प्राप्त करुन घेणे.


१०) राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्म समभाव, विज्ञाननिष्ठा, सामाजिक बांधिलकी, मानवता, निसर्गप्रेम, शुचिता, न्याय, समता, बंधुता, निर्भयता, स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा, नैतिक मूल्ये इत्यादी गुणांची जोपासना होणे.

११) इतर भाषा व भाषिकांविषयी आदर निर्माण होणे

१२) प्रादेशिक भाषा व बोलीभाषा यांच्याविषयी आपुलकीची भावना निर्माण होणे

ही सर्व उद्दिष्टे भाषेच्या मूलभूत कौशल्यावर आधारित आहेत. श्रवण,भाषण, वाचन, लेखन, रसास्वाद अभिवृत्ती आणि अभिव्यक्ती या उद्दिष्टांवर ती आधारित आहेत.

थोडक्यात




आकृती क्र.१.४

वरील भाषा अध्यापनाची उद्दिष्टे पाहिली तर एक गोष्ट लक्षात येते की, व्यक्तीच्या विकासामध्ये मातृभाषेला अनन्यसाधारण स्थान आहे. त्यामुळे विद्यार्थ्याचा व्यक्तिमत्त्व विकास साधण्यासाठी मातृभाषेचे अध्यापन हे एक प्रभावी साधन आहे. याची जाणिव मराठीच्या शिक्षकाला असणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांशी अनुबंध साधण्यासाठी मराठीच्या शिक्षकाच्या हातात मराठीचे पाठ्यपुस्तक असते. त्यात कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, संवाद, त्यातील उतारे दिलेले असतात तसेच कविताही असतात. या लेखनामध्ये लेखकाच्या कल्पना, भावना, विचार, मत, समाविष्ट असते. लेखक जे लिहतो ते उत्स्फूर्त भावनेतून लिहत असतो. मात्र त्याचा काय परिणाम व्हावा किंवा कोणता परिणाम व्हावा याची लेखनकर्ता अपेक्षा करीत असतो. शब्दांच्या माध्यमातून भावनेला स्पर्श करण्याचे प्रचंड सामर्थ्य लेखनामध्ये समाविष्ट असते. म्हणून पाठ्यांश लेखनातील कल्पना, भावना, विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविणे हाच या आशयघटकानुसार पाठ नियोजनाचा व त्यानुसार अध्यापन करण्याचा उद्देश आहे.

सदरच्या संशोधनातील निष्कर्ष हे आशयघटकानुसार पाठ नियोजनाबद्दलचे असल्यामुळे ते शिक्षक, शिक्षक प्रशिक्षणार्थी, विद्यार्थी यांना उपयुक्त ठरतील म्हणून सदरचे संशोधन संशोधकाने हाती घेतले आहे.

## १.५ संशोधनाची उद्दिष्टे

या संशोधनाची खालील उद्दिष्टे आहेत.

१) इयत्ता आठवीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकातील आशय घटक, कल्पना, भावना व विचार यानुसार पाठ निश्चित करणे.

२) नियंत्रित गटातील प्रशिक्षणार्थ्यांना पारंपरिक (हर्बाट पंचपदी) पद्धतीने पाठ नियोजनासाठी मार्गदर्शन करणे.

३) पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या पाठाचे निरीक्षण करणे. यासाठी शिवाजी विद्यापीठाचा १८ मुद्दयांचा पाठ निरीक्षण तक्ता व आशय घटक कल्पना, भावना व विचार पाठ निरीक्षण तक्ता वापरणे.

४) प्रायोगिक गटातील प्रशिक्षणार्थ्यांना कल्पना या आशय घटकानुसार पाठ नियोजन करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

५) कल्पना या आशयघटकानुसार होणाऱ्या अध्यापनाचे १८ मुद्दयांचा तक्ता व आशय-घटक कल्पनेचा पाठ निरीक्षण तक्ता यानुसार निरीक्षण करणे.

६) प्रायोगिक गटातील प्रशिक्षणार्थ्यांना भावना या आशयघटकानुसार पाठनियोजन करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

७) भावना या आशयघटकानुसार होणाऱ्या अध्यापनाचे १८ मुद्दयांचा तक्ता व आशय घटक भावना पाठ निरीक्षण तक्ता यानुसार निरीक्षण करणे.

८) प्रायोगिक गटातील प्रशिक्षणार्थ्यांना विचार या आशयघटकानुसार पाठनियोजन करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

९) विचार या आशयघटकानुसार होणाऱ्या अध्यापनाचे १८ मुद्दयांचा निरीक्षण तक्ता व आशयघटक विचार पाठ निरीक्षण तक्ता यानुसार निरीक्षण करणे.

१०) कल्पना या आशयघटकानुसार होणाऱ्या पाठाचे अध्यापन व पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या पाठाचे अध्यापन यांची तुलना करणे व अध्यापन प्रभावी होण्यासाठी सूचना देणे.

११) भावना या आशयघटकानुसार होणाऱ्या पाठाचे अध्यापन व पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या पाठाचे अध्यापन यांची तुलना करणे व अध्यापन प्रभावी होण्यासाठी सूचना देणे.

१२) विचार या आशयघटकानुसार होणाऱ्या पाठाचे अध्यापन व पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या पाठाचे अध्यापन यांची तुलना करणे व अध्यापन प्रभावी होण्यासाठी सूचना देणे.

## १.६ परिकल्पना

संबंधित समस्येसंबंधी परिकल्पना पुढीलप्रमाणे मांडल्या आहेत.

१) पारंपरिक पद्धतीने पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनापेक्षा कल्पना या आशयघटकानुसार पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनात फरक पडतो.

२) पारंपरिक पद्धतीने पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनापेक्षा भावना या आशयघटकानुसार पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनात फरक पडतो.

३) पारंपरिक पद्धतीने पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनापेक्षा विचार या आशयघटकानुसार पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनात फरक पडतो.

वरील संशोधनासंबंधी खालील शून्य परिकल्पना मांडल्या आहेत.

१) पारंपरिक पद्धतीने केलेल्या पाठनियोजनानुसारच्या अध्यापनात व कल्पना या आशयघटकानुसार केलेल्या पाठनियोजनानुसारच्या अध्यापनात काहीही फरक पडत नाही.

२) पारंपरिक पद्धतीने केलेल्या पाठनियोजनानुसारच्या अध्यापनात व भावना या आशयघटकानुसार केलेल्या पाठनियोजनानुसारच्या अध्यापनात काहीही फरक पडत नाही.

३) पारंपरिक पद्धतीने केलेल्या पाठनियोजनानुसारच्या अध्यापनात व विचार या आशयघटकानुसार केलेल्या पाठनियोजनानुसारच्या अध्यापनात काहीही फरक पडत नाही.

## १.७ संशोधनाची व्याप्ती

१) प्रस्तुत संशोधनामध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित असणाऱ्या एकात्मिक बी.ए.बी.एड्. शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचा समावेश आहे.

२) त्यातील कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी, जि.कोल्हापूर या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील द्वितीय वर्गातील बी.ए.बी.एड्.प्रशिक्षणार्थींचा समावेश केला आहे.

३) यात सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षातील मराठी प्रथम अध्यापन पद्धती व मराठी द्वितीय अध्यापन पद्धती असणाऱ्या २४ म्हणजे सर्व शिक्षक प्रशिक्षणार्थींचा समावेश केला आहे.

## १.८ संशोधनाची मर्यादा

१) सदरच्या संशोधनात शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संकग्नित एकात्मिक बी.ए.बी.एड्. (चार वर्षे) असणाऱ्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचाच समावेश करण्यात आला आहे.

२) द्वितीय वर्ष बी.ए.बी.एड्. मधील मराठी प्रथम अध्यापन पद्धती व मराठी द्वितीय अध्यापन पद्धती असलेल्या २४ म्हणजे सर्व प्रशिक्षणार्थींचा समावेश केला आहे.

३) हे संशोधन मराठीतील गद्य व पद्यातील आशय घटक कल्पना, भावना व विचार यापुरतेच मर्यादित आहे.

४) हे संशोधन इयत्ता आठवीच्या मराठी 'बालभारती' महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (१९९६) या पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित आहे.

५) सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षातील कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी, जि.कोल्हापूर येथील प्रशिक्षणार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

## १.९ प्रकरणीकरण

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा घेण्यासाठी प्रकरण योजना केली आहे खालीलप्रमाणे

**प्रकरण पहिले - प्रस्तावना**

या प्रकरणामध्ये संशोधनासंबंधी प्रस्तावना केलेली आहे. संशोधन समस्येचे शब्दांकन, समस्या विधानातील परिभाषिक संज्ञांचा अर्थ, त्यांच्या कार्यात्मक व्याख्या, संशोधनाचे महत्त्व, उद्दिष्टे, परिकल्पना, संशोधनाची व्याप्ती, मर्यादा या सर्व गोष्टींचा समावेश केला आहे.

**प्रकरण दुसरे - संशोधनासंबंधित संशोधनाचा आढावा**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या संदर्भात केलेल्या अभ्यासाचा आढावा घेऊन त्याची उपयुक्तता व मर्यादा स्पष्ट केल्या आहेत.

**प्रकरण तिसरे - आशय घटकानुसार पाठनियोजन**

या प्रकरणामध्ये पाठनियोजनाचे महत्त्व, उद्दिष्टे, दैनंदिन पाठाची पंचपदी (हर्बार्ट) यांचा संशोधनासाठी केलेला उपयोग, तसेच मराठीतील आशय घटक कल्पना, भावना, विचार यांच्या विषयी माहिती तसेच त्यांचा संशोधनात उपयोग याविषयी चर्चा केली आहे.

**प्रकरण चौथे - संशोधनाची कार्यपद्धती**

या प्रकरणामध्ये प्रस्तावना, संशोधना विषयी माहिती, प्रायोगिक पद्धतीचे स्वरुप, न्यादर्श निवड, संशोधन सामुग्री गोळा करण्यासाठी वापरलेली साधने व त्यांचे विश्लेषण केले आहे.

**प्रकरण पाचवे - संशोधन सामुग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संकलित माहितीची नोंद केली आहे. माहितीचे विश्लेषण व वर्गीकरण केले आहे. या विश्लेषणाच्या आधारे निरीक्षण व अन्वयार्थ लावण्यात आला आहे.

**प्रकरण सहावे- निष्कर्ष व शिफारशी**

या प्रकरणामध्ये संकलित माहितीआधारे जो अन्वयार्थ लावण्यात आला आहे. त्या आधारे निष्कर्ष दिले आहेत. त्या संबंधित काही शिफारशी केल्या आहेत. निष्कर्ष व शिफारशी या अध्यापन घटक कल्पना, भावना व विचार यानुसार इयत्ता आठवीच्या मराठी विषयाचे पाठ प्रभावी होण्यासाठी आहेत. याशिवाय पुढील संशोधनासाठी विषय यांचा समावेश केला आहे.

## १.१० समारोप

सदर प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधनाची पार्श्वभूमी विशद करण्यासाठी यथायोग्य आराखडा केलेला आहे. त्यामध्ये प्रस्तावना, समस्येचे शब्दांकन, संशोधनाची गरज, महत्त्व, पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या, संशोधनाची उद्दिष्टे, परिकल्पना, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, प्रकरणीकरण या बाबींची चर्चा केली आहे. या प्रकरणाने संशोधनाची व्यापक कल्पना येण्यास मदत होईल.

## संदर्भ


१) येवले, सीमा.(२००५). शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि माहीती तंत्रविज्ञान, नित्य नूतन प्रकाशन, पुणे. (पा.नं.३८)

२) सरपोतदार, पी.ए. भोसले, ए.व्ही. सांगळे, के.एन. (२००२). आशययुक्त अध्यापन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पा.नं.४७)

३) तत्रएव (पान नं.४७)

४) तत्रएव (पान नं.४७)

५) तत्रएव (पान नं.४७)

६) तत्रएव (पान नं.४७)

७) पवार, ना.ग.(२००५). मातृभाषा मराठीचे आशययुक्त अध्यापन, नूतन प्रकाशन, पुणे. (पा.नं.८०)

८) करंदीकर, सुरेश. (२००६). शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पा.नं.२७०)

९) सोहनी, श.कृ.(१९९३) शैक्षणिक टीपाकोश (पा.नं. )

१०) वाळींबे रा.श.(१९५५). साहित्य मीमांसा, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे.

११) तडसरे, वि.दि. (२००६). मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पा.नं.९०)

१२) तत्रएव (पान नंबर ९१)

१३) सोहनी, श.कृ.(१९९३) शैक्षणिक टीपाकोश

१४) गाजरे, रा.वि. व चिटणीस अशुमती (२००६) अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र आणि मानसशास्त्रीय प्रयोग, नूतन प्रकाशन, पुणे. (पा.नं.२२७)

१५) तत्रएव (पा.नं.२२७)

१६) तत्रएव (पा.नं.२८)

१७) गवस, राजन (१९९५). मराठी आशययुक्त अध्यापन, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. (पा.नं.१३६)

१८) सरपोतदार, भोसले व सागळे (२००२) आशययुक्त अध्यापन पद्धत, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पा.नं.६२)

१९) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (२००३) पाठनियोजन कौशल्ये पुस्तिका, नासिक (पा.नं.१३)

२०) शब्दकोश

२१) कळ्के, शिरगावे, शिंडगे (२००५). अध्ययनार्थ्यींचे मानसशास्त्र व अध्यायन प्रक्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पा.नं.१९६)